दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २९६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२० जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# रायगडात सहा नगरपंचायतीचा निकाल जाहीर

## म्हसळा, माणगाव, तळा नगरपंचायतीवर सुनील तटकरेंचे वर्चस्व कायम

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील सहा नगर पंचायतींच्या निकालात १०२ जागा पैकी राष्ट्रवादीने ३८, तर शिवसेनेने ३५ सर्वाधिक जागा जिंकल्या. यात तळा आणि म्हसळा नगरपंचायतीवर राष्ट्रवादीने बहुमत मिळवले, तर शिवसेनेने पोलादपूर नगर पंचायतीवर एकहाती सत्ता मिळवली आहे. या दोन प्रमुख पक्षांमधील चढाओढ इतर नगर पंचायतीमध्ये सत्ता स्थापनेपर्यंत कायम राहणार आहे. नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर होणाऱ्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीनंतर कोणत्या पक्षाचे कोणत्या ग्राम पंचायतीवर कोणाचा नगराध्यक्ष, हे स्पष्ट होईल. रायगडात कही खुशी कही गमचे चित्र दिसून आले.

सहा नगरपंचायतीच्या निवडणुकीत विविध राजकीय पक्षाचे नेतेगण पदाधिकारी यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, उद्योगमंत्री सुभाष देसाई, माजी पालकमंत्री रविन्द्र चव्हाण, आमदार महेंद्र दळवी, आ. भरत गोगावले, माजी आमदार धैर्यशील पाटिल, आदिनी प्रचारात सहभागी होऊंन उमेदवारांच्या प्रचारात आघाडी घेतली होती. दरम्यान, या निवडणुकीत भाजपाने मोठी हवा निर्माण केली होती; मात्र, भाजपाला नगरपंचायतीच्या मतदारांनी नाकारल्याचे निकाला वरून दिसत आहे. तर शेतकरी कामगार पक्षाने आपली सदस्य संख्या कायम राखण्याचा प्रयत्न केला.

## शिवसेनेला जबर धक्का : तळा नगरपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता

**दै.रायगड नगरी । तळा**





तळा नगरपंचायत निवडणुकीच्या निकालात राष्ट्रवादीचे खा.सुनील तटकरे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीनं बाजी मारली आहे. राष्ट्रवादीनं १७ पैकी १० जागा जिंकत एकहाती सत्ता काबिज केली आहे.

राष्ट्रवादीनं १०, शिवसेना २, भाजपा २, शिवसेना पुरस्कृत अपक्ष २, भाजपा पुरस्कृत अपक्ष १ अशा जागा जिंकता आल्या आहेत. १७ जागा असलेली तळा नगरपंचायतीत ओबीसी आरक्षणाच्या घोळामुळे १३ जागांवर मतदान २२ डिसेंबरला पार पडलं तर उर्वरीत ४ जागांसाठी काल मतदान झालं. गेल्या वेळी १३ जागांपैकी जोगवडी येथील उमेदवार पोळेकर बिनविरोध निवडून आले होते त्यामुळे १२ जागेसाठी मतदान प्रक्रिया पार पडली होती. तळा नगरपंचायत निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे खा.सुनील तटकरे व शिवसेनेचे मंत्री ना.सुभाष देसाई या दोन नेत्यांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली होती.

तळा नगरपंचायतीवर खा.सुनील तटकरे पालकमंत्री आदिती तटकरे यांच्यावर विश्वास ठेऊन तळेवसियांनी गेली २० वर्षे असणारी शीवसेनेची सत्ता उलथवून लावली त्याबद्दल सर्व मतदारांचे आभार आ.अनिकेत तटकरे यांनी मानले व येणाऱ्या पाच वर्षात तळेवसियांना अपेक्षित असणारा विकास आपण पूर्ण करू, असे आश्वासन त्यांनी दिले. त्याच प्रमाणे या विजयाने उतू नका मातू नका, आपल्याला जमीनीवर राहून जनतेची सेवा करायची आहे असा सल्ला त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना दिला.

## नगरपंचायतवर सत्ता परिवर्तनातून माणगांवकरांची विकास आघाडीला पसंती

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



माणगांव नगरपंचायतवर शिवसेना काँग्रेस अपक्ष(भाजप) या पक्षांनी एकत्र येत माणगांव विकास आघाडी केली व आपले वर्चस्व सिध्द केले आहे. त्यांच्या पॅनल मधिल अनुक्रमे १ प्रभाग क्र.५ भादाव मधुन राजेश गोकुळदास मेथा अपक्ष (भाजप), २ प्रभाग क्र.८ विकास कॉलनी परिसर मधुन निलीमा नितीन बामुगडे (शिवसेना), ३ प्रभाग क्र.११ नाणोरे मधुन कपिल बबन गायकवाड (शिवसेना), ४ प्रभाग क्र.१२ बामणोली रोड मधुन अजित चंद्रकांत तार्लेकर (शिवसेना), ५ प्रभाग क्र.१३ बाजारपेठ मधुन शर्मिला शोभन सुर्वे (शिवसेना), ६ प्रभाग क्र.१४ मधुन सचिन मारुती बोंबले (शिवसेना), ७ प्रभाग क्र.१५ मधुन प्रशांत अशोक साबळे (शिव-सेना), ८ प्रभाग क्र.१६ खांदाड मधुन ज्ञानदेव मारुती पोवार (काँग्रेस), ९ प्रभाग क्र.१७ जुने माणगांव मधुन दिनेश बाळकृष्ण रातवडकर (शिवसेना) असे ७ शिवसेना + १ काँग्रेस + १ अपक्ष (भाजप) मिळून एकुण १७ प्रभागातून ९ उमेदवार विजयी झाले आहेत.

तसेच राष्ट्रवादी कडून अनुक्रमे १ प्रभाग क्र. १ मधुन लक्ष्मी चंद्रकांत जाधव (राष्ट्रवादी), २ प्रभाग क्र.२ सुविधा संतोष खैरे (राष्ट्रवादी), ३ प्रभाग क्र.३ मधुन आनंद शिवराम यादव (राष्ट्रवादी), ४ प्रभाग क्र.४ उतेखोल गाव मधुन राष्ट्रवादी पुरस्कृत ममता कुंडलिक थोरे (शेकाप), ५ प्रभाग क्र.६ मधुन हर्षदा सतिश सोंडकर(राष्ट्रवादी), ६ प्रभाग क्र.७ मधुन सुशिला शिवाजी वाढवळ (राष्ट्रवादी), ७ प्रभाग क्र.९ मधुन रश्मी सागर मुंढे (राष्ट्रवादी), ८ प्रभाग क्र.१० मधुन रिया रत्नाकर उभारे (राष्ट्रवादी) असे मिळुन ७ राष्ट्रवादी + १ शेकाप एकुण ८ उमेदवार विजयी झाले आहेत. एकंदरीत माणगांवकरांनी सत्ता शिवसेनेच्या हाती सोपवली आहे.

## म्हसळा नगरपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळाचा गजर

### १७ पैकी १३ जागा राष्ट्रवादी, काँग्रेस २ आणि शिवसेना २ आणि काँग्रेस जागांवर विजयी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



म्हसळा नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२१ -२२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध काँग्रेस आय - शिवसेना युतीच्या अटीतटीच्या लढतीत राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा एकदा म्हसळा नगर पंचायतीवर एकहाती सत्ता प्रस्थापित करून गड कायम राखण्यात यश मिळवले आहे. काँग्रेस आणि शिवसेना युतीने राष्ट्रवादी काँग्रेसला कडवी टक्कर देवुन दोन, दोन अशा चार जागा निवडुन आणल्या आहेत.

दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजी पार पडलेल्या १२ प्रभागातील आणि दिनांक १८ जानेवारी २०२२ रोजी पार पडलेल्या ४ प्रभागातील निवडणूक मिळुन १६ जागांसाठी निवडणुक प्रकिया पार पडली होती तर प्रभाग क्रमांक ४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरोज मंगेश म्हशीलकर या बिनविरोध निवडुन आल्या होत्या.१६ प्रभागात पार पडलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे १२ तर सेना काँगेसचे प्रत्येकी २ असे ४ उमेदवारांनी विजय मिळवला आहे.

निकालाचे दिवशी निवडनुक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अमित शेडगे, सहा.निवडणूक अधिकारी मनोज उकिर्डे यांनी निवडणूक प्रकिया सकाळी १० वाजता वेळेत सुरू करून अवघ्या दीड तासात सर्व निकाल जाहीर केले. या कामी म्हसळा पो-लीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

प्रभाग क्रमांक ९ आणि १० मध्ये काँग्रेसने आपल्या जागा राखण्यात यश प्राप्त केला आहे. येथे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष डॉ. मुविज शेख यांनी राष्ट्रवादीचे खंदे कार्यकर्ते शाहिद उकये यांचे चिरंजीव अब्दुल उकये यांचा मोठया फरकाने पराभव केला आहे. हा पराभव राष्ट्रवादीचे जिव्हारी लागल्याचे बोलले जात आहे तर प्रभाग क्रमांक १० मध्ये काँग्रेसच्या सुफीयान हलदे याने राष्ट्रवादीचे मुबिन हर्जुक यांचा अवघ्या तीन मतांनी पराभव केला आहे तर प्रभाग क्रमांक १२ मध्ये राष्ट्रवादीचे शाहिद जंजिरकर यांनी काँग्रेसचे तालुका सचिव रविंद्र दळवी यांचा अवघ्या एका मताने पराभव केला आहे. या ठिकाणी अत्यंत चुरशीची निवडणूक झाली होती.

## पाली नगरपंचायत निवडणुकीत शेकाप व राष्ट्रवादी काँग्रेसने मारली बाजी



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली नगरपंचायतीचा निवडणूक निकाल बुधवारी (ता.१९) जाहीर झाला आहे. पाली तहसील कार्यालयात मतमोजणी प्रक्रिया संपन्न झाली. या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत १७ पैकी १० जागांवर शेकाप व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत. त्यामुळे आता आघाडीच्या हाती नगरपंचायतीची सूत्रे आली आहेत.

यामध्ये शेकाप उमेदवार प्रणाली सूरज शेळके या सर्वाधिक तब्बल २३६ मते मिळवून आघाडीवर राहिल्या तर राष्ट्रवादीचे उमेदवार सुधीर मारुती भालेराव हे एक मताने निवडून आले आहेत.

अष्टविनायकाचे तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील ही पहिलीच नगरपंचायत निवडणूक असल्याने ही निवडणूक सर्वच पक्षांसाठी प्रतिष्ठेची होती. या निवडणुकीत शिवसेना व भाजप वेगवेगळे लढत होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शेकाप यांनी आघाडी करून निवडणूक लढविली. विशेष म्हणजे सर्वच पक्षांनी निवडणुकीत कमी अधिक प्रमाणात खाते उघडली आहेत. शिवाय एक अपक्ष उमेदवार देखील निवडून आला आहे. त्यामुळे एकूण सर्वत्र आनंदी व समाधानी वातावरण होते.

## पोलादपूर नगरपंचायतीत शिवसेनेचे वर्चस्व





**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या अफाट मेहनतीनंतर शिवसेनेविरोधात केलेल्या लढतीत काँग्रेसने भाजपचे, राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसचे तर भाजपने काँग्रेसचे उमेदवार पाडल्याने शिवसेनेचा आश्चर्यकारक विजय झाला असून भारतीय जनता पार्टीने अनेक ठिकाणी चिखल करीत एका प्रभागात कमळ फुलवून आणल्याचे चित्र दिसून आले आहे. १७ प्रभागांपैकी शिवसेनेला १० तर काँग्रेस पक्षाला ६ उमेदवार निवडून आणता आले आहेत तर भाजपच्या एक उमेदवार विजयी झाल्या आहेत.

विरोधी मतांचे विभाजन काँग्रेस व भाजपमध्ये झाल्याचा प्रचंड लाभ शिवसेनेला झालेला मतदानाची आकडेवारी स्पष्ट करीत आहे. शिवसेनेकडून आ.भरत गोगावले, युवासेना अधिकारी विकास गोगावले, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, कृउबा संचालक लक्ष्मण मोरे, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी विजयी उमेदवारांचे कौतुक करण्यास उपस्थित होते. काँग्रेसकडून महाड विधानसभा नेते हनुमंत जगताप, प्रदेश सचिव स्नेहलदिदी जगताप कामत, महाडचे माजी नगराध्यक्ष संदीप जाधव तसेच पोलादपूर काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादीचे खासदार व पालकमंत्री आघाडीच्या प्रचारामध्ये सक्रीय होऊनही याठिकाणी आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही उमेदवार विजयी न झाल्याने नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा चंचूप्रवेश झाला नाही.

## खालापूर नगरपंचायत निवडणूक शिवसेना अव्वल; राष्ट्रवादीच्या हातात सत्तेच्या चाव्या

**दै.रायगड नगरी । खोपोली**



राज्यात हातात हात घालून सत्ता उपभोगणारे मात्र, मतदार संघात विस्तव ही जात नसलेल्या शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसवर खालापूर नगर पंचायत निवडणूक निकालाने 'धरले तर चावते आणि सोडले तर पळते' अशी परिस्थिती आणून ठेवली आहे. अव्वल ठरलेल्या शिवसेनेला सत्तेच्या चाव्या असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाणे क्रमप्राप्त ठरणार आहे. तर दुसरीकडे शेकापलाही अखेरपर्यंत संधी असल्याने 'वक्त ने किया क्या हसीन सितम' अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

आ. महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या शिवसेनेने दहा वर्षानंतर सत्ता ओढून आणली आहे, पण जंगम दाम्पत्याच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या शेतकरी कामगार पक्षा (शेकाप) ने राष्ट्रवादी व से-नेला चांगलेच झुंजवले. दरम्यान, कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघात आघाडी नको, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाप्रमुख माजी आ. सुरेश लाड यांनी 'राजीनामास्त्र' उपसले होते. पण आता सेनेसोबत गेल्यास सत्तेचा साज राष्ट्रवादीवरही चढणार असल्याने जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे व राष्ट्रीय सरचिटणीस खा. सुनील तटकरे माजी आ. लाड यांची मर्जी राखणार की तळे चाखणार? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

विजयी उमेदवार :- प्रभाग क्रमांक : १ जोशी आकेश शेकाप, प्रभाग क्रमांक : २ जंगम संतोष, शेकाप, प्रभाग क्रमांक : ३ पवार किशोर, शिवसेना, प्रभाग क्रमांक : ४ वाघमारे मीना शिवसेना, प्रभाग क्रमांक : ५ मोडवे रोशना, शिवसेना, प्रभाग क्रमांक : ६ पारठे राजेश, राष्ट्रवादी, प्रभाग क्रमांक : ७ लोते लता, शिवसेना, प्रभाग क्रमांक : ८ जाधव महेश, शिवसेना, प्रभाग क्रमांक : ९ कदम प्रणिता, शेकाप, प्रभाग क्रमांक : १० डॉ. जाधव दिपाली, शेकाप, प्रभाग क्रमांक : ११ निधी उज्वला शिव-सेना, प्रभाग क्रमांक : १२ फराट दिनेश, शेकाप, प्रभाग क्रमांक १३ पवार महेश, शेकाप, प्रभाग क्रमांक: १४ शहा गौरव, शेकाप, प्रभाग क्रमांक १५ पाटील सुनीता, शिवसेना, प्रभाग क्रमांक : १५ गुरव श्वेता, राष्ट्रवादी, प्रभाग क्रमांक : १७ कांबळे मीनल शिवसेना

# कोस्टल बर्थ जेट्टीचेही येत्या महिनाभरात खासगीकरण



**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलचे खासगीकरण करण्यासाठी निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असतानाच आता १७० कोटी खर्चून नव्याने उभारण्यात आलेल्या कोस्टल बर्थ जेट्टीचेही पीपीपी तत्वावर खासगीकरण करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. येत्या महिनाभरात कोस्टल बर्थ जेट्टी पीपीपी तत्वावर चालविण्यास देण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती जेएनपीटी अध्यक्ष संजय सेठी यांनी दिली आहे.

जेएनपीटी बंदरातून देशातील एकूण सरकारी ११ बंदरांपैकी ५३ टक्के मालाची वाहतूक केली जाते. जेएनपीटी बंदरातून दररोज ४० टक्के कंटेनर मालाची वाहतूक केली जाते.याच बंदरातून कंटेनर ट्रेलर मुंबई भिवंडी, नवी मुंबई, पनवेल येथील मोठ मोठ्या गोदामात ने-आण केली जाते.या गोदामातून कंटेनर मालाचे देशभरात वितरण केले जाते. बंदरातुन दररोज आयात-निर्यात होणाऱ्या रोडच्या माध्यमातून मालाची वाहतूक केली जाते.दररोज सुमारे वीस हजार कंटेनर मालाच्या वाहतुकीमुळे जेएनपीटी पासुन ठाणे, मुंबई पर्यंत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते.

सातत्याने होणाऱ्या या वाहतूक कोंडीच्या समस्येंमुळे माल वेळेत पोहचण्यात विलंब होतो. विलंबामुळे व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते.त्यामुळे व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागते.वेळही वाया जातो.किनारपट्टीवरील मालवाहतुकीला चालना देण्यासाठी आणि वाहतुकीची समस्या कायमची कमी करण्यासाठी बंदरे,नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या सागरमाला कार्यक्रमांतर्गत जेएनपीटीने कोस्टल जेट्टी उभारली आहे.

१७०.२० कोटी खर्चाच्या या कोस्टल बर्थवरुन २.५ दशलक्ष टन मालाची वाहतूक करण्याची योजना आहे.यामध्ये ब्रेक बल्क, ड्राय बल्क, सिमेंट,ईडिबल ऑईल आदी मालाची रोड ऐवजी थेट समुद्रमार्गे देशभरात वितरण करण्यात येणार आहे.सिमेंट स्टोरेजसाठी जेएनपीटी ११ हेक्टर बँकअप क्षेत्रासह कार्गो स्टोरेज यार्ड,गोदामे उभारणार आहे.तसेच किनारपट्टीवरील मालवाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी चांगल्याप्रकारे पायाभूत सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

कोस्टल बर्थमुळे रस्ते आणि रेल्वेवरील माल वाहतुकीचा भार कमी होण्यास मदत होणार आहे. जहाजाच्या फेऱ्या जलदगतीने होण्यासाठीही मोठी मदत होणार आहे. तसेच वाहतूकीसाठी कमी होणाऱ्या स्पर्धात्मक दराचा फायदाही व्यापाऱ्यांना होणार असल्याची माहिती जेएनपीटी अध्यक्ष संजय सेठी यांनी दिली आहे. कोस्टल बर्थमुळे सागरी किनारपट्टीवरील मालवाहतुक ग्रीन चॅनलमधुन निर्धोक होणार आहे. देशांतर्गत मालवाहतूकीमध्ये किनारपट्टीवरील मालवाहतुकीचा हिस्सा वाढणार आहे.पर्यायाने आयात निर्यात व्यापारी वर्गाला त्याचा अधिक फायदा व मदत होणार आहे.

बंदराच्या भागधारकांनाही आर्थिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुरक वातावरण निर्माण झाले आहे.त्यामुळे गुंतवणुकदार नियोजन पध्दतीने गुंतवणूक करीत आहेत. जेएनपीटीच्या १७० कोटी खर्चून नव्याने उभारण्यात आलेल्या कोस्टल बर्थ जेट्टीचे बांधकाम नोव्हेंबर २०२० मध्येच पुर्ण झाले आहे.ड्रेझिंगचे कामही अंतिम टप्प्यात आहे.कोस्टल बर्थ जेट्टी पीपीपी तत्वावर चालविण्यासाठी केंद्र सरकारकडून येत्या आठवडाभरात मंजुरीही मिळेल.त्यानंतर येत्या काही दिवसात कोस्टल बर्थ जेट्टीच्या खासगीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होईल अशी माहिती जेएनपीटी अध्यक्ष संजय सेठी यांनी दिली आहे.

# वांगणी ग्रमापंचायतीच्या पोटनिवडणुकीत आघाडीचे एकनाथ ठाकूर विजयी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील वांगणी ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ३ मधील रिक्त झालेल्या जागेसाठी घेण्यात आलेल्या पोटनिवडणूकीत शेकाप, राष्ट्रवादी व शिवसेना आघाडीचे उमेदवार एकनाथ ठाकूर ( मते ३३२) यांनी मनसे उमेदवार हिराचंद दळवी ( मते २८२) यांचा ५० मतांनी दणदणीत पराभव करून विजय संपादन केला. दरम्यान आघाडीचे उमेदवार एकनाथ ठाकूर यांचा विजय झाल्याचे वृत्त समजताच राष्ट्रवादीचे नेते भाई टके, राष्ट्रवादीचे नागोठणे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे विभागीय अध्यक्ष प्रमोद जांबेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस विनय गोळे, वांगणीचे माजी उपसरपंच एकनाथ जांबेकर, नागोठणे ग्रा. पं.चे सदस्य राजेश पिंपळे आदींसह आघाडीच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकनाथ ठाकूर यांचे अभिनंदन केले.



आघाडीचे विजयी उमेदवार एकनाथ ठाकूर वांगणी गावात पोहचताच आघाडीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून विजयी जल्लोष साजरा केला. यानंतर विजयी उमेदवार एकनाथ ठाकूर यांची गावातून विजयी मिरवणूक काढण्यात आली. विजयी मिरवणुकीत ह.भ.प. दळवी गुरुजी, शंकर ठाकूर, लहू तेलंगे, रमेश भिसे, चंद्रशेखर ठाकूर, किशोर कदम, लीलाधर भिसे, एकनाथ दळवी, यशवंत यादव, नरेश दळवी, दिलीप तेलंगे, मनोज जाधव, कांचन ठाकूर, पांडुरंग जाधव, सचिन भालेराव, राजू मोरे, मोहन मांडे आदींसह आघाडीचे कार्यकर्ते बहुसंख्येने सहभागी झाले होते.

# वरसगाव ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत पुनम आंब्रूस्कर विजयी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील नामवंत समजल्या जाणाऱ्या वरसगाव ग्राम पंचायत मध्ये प्रभाग क्रमांक एक मध्ये संपन्न झालेल्या पोटनिवडणुकीत सापया ग्राम विकास व शिवसेना, भाजप, शेकाप , आघाडीच्या सौ पुनमताई अजित आंब्रूस्कर ह्या भरघोस मतांनी विजयी झाल्या आहेत.

वरसगाव ग्राम पंचायतीतील प्रभाग क्रमांक एकचे राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार सीताराम बागुल यांचे निधन झाल्याने या जागेवर १८ जानेवारी २०२२ रोजी पोटनिवडणुक घेण्यात आली या करिता राष्ट्रवादीकडून विजय मधुकर बागुल यांच्या विरोधात आघाडीच्या उमेदवार माजी उपसरपंच अजित आंब्रूस्कर यांच्या पत्नी सौ पूनम आंब्रूस्कर यांच्यात ही चुरशीची निवडणूक झाली होती या निवडणुकीचा निकाल १९ जानेवारी रोजी हाती आला असून यात सापया वरसगाव गाव विकास आघाडी व शिवसेना ,भाजप , शेकाप आघाडीच्या अधिकृत उमेदवार सौ पूनम आंब्रूस्कर यांनी विजय बागुल यांचा पराभव करत भरघोस मतांनी विजयी निवडून आल्या आहेत. संपन्न झालेल्या पोटनिवडणुकीत विजयी उमेदवार सौ पूनम अजित आंब्रूस्कर या भरघोस मतांनी निवडून आल्याने त्यांचे कोलाड आंबेवाडी नाक्यावरील कै. द.ग.तटकरे चौकात मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत करत अभिनंदन करून त्यांना रोहा तालुका शिवसेनाप्रमुख समीर शेडगे,उपतालुकप्रमुख चंद्रकांत लोखंडे,माजी पं. सं. सदस्या सौ चेतनाताई लोखंडे,संभे ग्राम पंचायत सरपंच समीर महाबळे,गणेश शिंदे,कुलदीप सुतार, संजय लोटणकर, रविंद्र तारू,वरसगाव ग्रामस्थ आदींनी त्यांना यावेळी शुभेच्छा दिल्या .

# ...अन्यथा युवा सेना रस्त्यावर उतरणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासनाने (ठाकरे सरकार) राज्यभरातील दुकानावरील पाट्या मोठ्या अक्षरात मराठीत तसेच सोबत आपल्या आवडीनुसार तर कोणत्याही भाषेत लहान अक्षरात लावण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यानुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्वच दुकानधारकांना विशिष्ट वेळ देऊन पालिकेच्या माध्यमातून पाट्या मराठीत लावण्याचे आवाहन पनवेल महापालिकेने करावे अन्यथा युवा सेना आपल्या पद्धतीने रस्त्यावर उतरुन कारवाई करेल असा इशारा पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांना दिलेल्या निवेदनात युवा सेना उपजिल्हाधिकारी अवचित राऊत यांनी दिला आहे.

यावेळी युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, विधानसभा अधिकारी पराग मोहीते पनवेल शहर अधिकारी सनी टेमघेरे, खारघर शिवसेना संघटक रामचंद्र देवरे, पनवेल शहर संघटक प्रवीण जाधव नवीन पनवेल अधिकारी, निखील दिघे युवा सेना अधिकारी संकेत पाटील, सुधीर शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना अवचित राऊत यांनी सांगितले की, आम्ही सुद्धा आवाहन करणार आहोत, पनवेल महापालिकेने सुद्धा अशा प्रकारे आवाहन करून ठराविक मुदतीमध्ये सर्व फलक शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे मराठी लावावेत, तद्पश्चात ही मुजोर दुकानदार प्रशासनाचा निर्णय मानत नसतील तर त्यांच्या विरोधात शिवसेना स्टाईलने आंदोलन करून पाट्या मराठीत लावण्यास भाग पाडू व त्याची सर्वस्वी जबाबदारी दुकानदारांची असेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल अवनिश शिवशंकर शुक्ला यांच्या नावे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे सिडको ॲलाटमेन्ट लेटर त्यांच्या नकळत हरविले आहे व बराच शोध घेवून देखील त्यांना ते अद्याप पर्यंत मिळालेले नाही. सदर मिळकतीचे वर्णन :-

**मालमत्तेचा तपशिल**
**प्लॉट ३१, सदनिका क्र.१७, सौरभ को.ऑप.हौ.सोसायटी, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ : २८ मी.**

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील मिळकतीचे सिडको ॲलाटमेन्ट लेटर कोणाला सापडल्यास ते नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत दाखल करावे. तसे न झाल्यास ते कागदपत्र गहाळ समजण्यात येईल व त्या कागदपत्रासंदर्भात कोणाकडून बेकायदेशीर काम झाल्यास त्यासाठी माझे अशिल जबाबदार नसतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण : खारघर
दिनांक : १९/०१/२०२२

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, से.१२**
**खारघर, नवीमुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री.लक्ष्मण पदाजी घरत व इतर यांच्या सहमालकीची, वहिवाटीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २९९ | १ | ०-४०-८० पो.ख. ०-०६-८० एकूण क्षेत्र ०-४७-६० पैकी ०-२२-०० या मिळकतीचे क्षेत्र | ४.३१ |

वरील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत आमचे अशिल व जमिनीचे मालक श्री.लक्ष्मण पदाजी घरत व इतर यांचेमध्ये सदर जमीन खरेदी व्यवहाराबाबत बोलणी चालू आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, गहाण, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, करार, मदार, वहिवाट, चतुःसिमा इत्यादी किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष येवून अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. त्यानंतर कोणचीही कसलेही प्रकारची तक्रार चालणार नाही तसेच हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी आपले हक्क व हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०१/२०२२

**सही/-**
**श्री.एन.ए.भोईर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**सुशिल प्राईड, २०१-२०२,**
**गार्डन हॉटेल जवळ, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६२०२२७२**

## जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.१९४३ प्रमाणे मौजे : उलवे नोड येथे सेक्टर क्र.१८, भूखंड क्र.१८ ए, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड कै.बाळाराम पांडू कोळी तर्फे वारस कै.महादेव बाळाराम कोळी तर्फे वारस श्री.नितीन महादेव कोळी रा.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची व ताबे कब्जातील भूखंड आहे.

कै.बाळाराम पांडू कोळी तर्फे वारस कै.महादेव बाळाराम कोळी तर्फे वारस श्री.नितीन महादेव कोळी यांनी त्यांचे मालकीचा मौजे : उलवे नोड येथे सेक्टर क्र.१८, भूखंड क्र.१८ ए, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा सौ.सुरेखा दिलीप पाटील, रा.फ्लॅट क्र.५, दर्शन सीएचएस सी-११, १ फ्लॉर, सेक्टर २५, जुई नगर, नवी मुंबई यांस कायमस्वरुपी विक्री करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि सौ.सुरेखा दिलीप पाटील, रा.फ्लॉट क्र.५, दर्शन सीएचएस सी-११, १ फ्लॉर, सेक्टर २५, जुईनगर, नवी मुंबई हे सदर भूखंडाबाबत सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल.

दि.१९/०१/२०२२

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**कार्यालयीन पत्ता : १ मजला,**
**श्री प्रेरणा अर्पा., उरण,**
**ता.उरण, जि.रायगड**
**संपर्क : ९७०२२०९११४**

# किशोरभाई म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स नागोठणे प्रकल्पग्रस्तांचा उपोषणास प्रारंभ

**दै.रायगड नगरी । नागोठणे**



नागोठणे येथील रिलायन्स (पूर्वीची आय. पी.सी.एल) कंपनीमध्ये स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत. त्यानुसार या कंपनीत येथील काही प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळाल्या, परंतु बरेच प्रकल्पग्रस्त शेतकरी अजून देखील कायमस्वरूपी नोकरी पासून वंचित आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांवर कंपनी व्यवस्थापनाने अन्याय केला असून या अन्यायग्रस्त प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कंपनी व्यवस्थापनाने कायमस्वरूपी नोकरीत सामावून घ्यावे या मुख्य मागणीसाठी प्रकल्पग्रस्तांचे नेते स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्त शेतकरी गोरखनाथ पारंगे, मनोज पारंगे, गंगाराम पारंगे हे तिघेजण बुधवार दिनांक १९ जानेवारी पासून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसले असून या उपोषण कर्त्यांना प्रकल्पग्रस्त समितीचे किशोरभाई म्हात्रे, प्रल्हाद पारंगे, कृष्णा पारंगे, खांडेकर गुरुजी, रंजना माळी, सायली पाटील, संदीप पाटील, रोशन माळी, दिनेश दांडेकर, योगिता शिंदे, दिपेश चोरगे, भरत म्हात्रे आदींनी पाठींबा दिला आहे.

तब्बल ३१ वर्ष उलटून गेले असताना रिलायन्स कंपनीत नौकरी पासून वंचित असलेले ५४७ प्रकल्पग्रस्तांवर रिलायन्स व्यवस्थापनाने अन्यायच केला आहे. जो पर्यंत रिलायन्स व्यवस्थापन अन्यायग्रस्त प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नौकरी देत नाहीत तो पर्यंत उपोषण चालूच राहणार असून या उपोषणामुळे उपोषण कर्त्यांच्या जीवितास काही धोका झाल्यास त्याची सर्वश्री जबाबदारी रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व महाराष्ट्र शासन यांच्यावर राहील असा इशारा प्रकल्पग्रस्तांचे नेते किशोरभाई म्हात्रे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिला आहे.

याबाबत अधिक माहिती देताना किशोरभाई म्हात्रे यांनी सांगितले की, स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने मागील दोन वर्ष वारंवार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करून देखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ठोस कारवाई तर झाली नाहीच परंतु साधे प्रतिउत्तराचे पत्र देखील न दिल्याने प्रकल्पग्रस्त शेतकरी संतप्त झालेली आहेत तसेच आय.पी.सी.एल कारखान्यासाठी आम्हा सर्व प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या जमिनी त्या काळात शासनाने कमी मोबदल्यात घेतलेल्या आहेत. त्यामुळे आमचा नोकरीचा प्रश्न हा जिल्हा प्रशासनानेच सोडवायचा आहे, तरी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा नोकरीचा प्रश्न शासनाने गांभीर्याने विचार करून सोडवावा. दि. २५/०४/१९९० रोजीच्या निर्णयानुसार रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या व्यवस्थापनाने अन्यायग्रस्त ५४७ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नौकरी द्यावी ही मुख्य मागणी असल्याचे किशोरभाई म्हात्रे यांनी सांगितले.

## पनवेल महानगरपालिका
**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां./२२२१/२५०/२०२२ दि.१९/०१/२०२२

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १४ | फा.प्लॉट क्र.२९/५, सदनिका क्र.बी-१, निळकंठ गार्डन, पनवेल | कामिनी कमलाकर पाटील | नीता प्रकाश गोहेल |
| २ | ११ | फा.प्लॉट क्र.८०, सदनिका क्र.बी-१, कैलास पार्क सोसा, पनवेल | काशिनाथ रामचंद्र गायकवाड सिंधू काशिनाथ गायकवाड | मुरलीधर धनेश्वर नायर अलंकनंदा मुरलीधर नायर |
| ३ | ११ | फा.प्लॉट क्र.७०, सदनिका क्र.६०२, गोविंद गार्डन, पनवेल | मे.प्रियल एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार जयेश भुपेंद्र गांधी | महेंद्र पांडुरंग पाटेकर मनस्वी महेंद्र पाटेकर |
| ४ | १५ | घर क्र.३९, धाकटा खांदा, पनवेल | मंगळ्या काथोर पाटील | गणपत मंगळ्या पाटील गुरुनाथ मंगळ्या पाटील |
| ५ | १४ | सर्व्हे क्र.७९७/२, सदनिका क्र.ए-१०४, प्रेस्टीज गार्डन सोसा, पनवेल | अभिषेक अनंत घरत राजेंद्र हरी लोंढे | सय्यद अब्दुल करीम हबीब सय्यद मिनाझ अब्दुल करीम |
| ६ | ७ | फा.प्लॉट क्र.५१८, सदनिका क्र.७, शम्स अपार्टमेंट, पनवेल | अशफाक सदुल्ला खामकर | मुजम्मिल अमनउल्लाह करदमे |
| ७ | ७ | प्रॉ.क्र.१६३/१, १४७/१, १४७/अे, १६३ बी, सदनिका क्र.८, पारस अपार्टमेंट, पनवेल | सलीम दाऊद काद्री | आसिफ मोहम्मद सईद काझी |
| ८ | ७ | ६३/६८, सदनिका क्र.६०५, रिव्हर व्ह्यू सोसा, पनवेल | फवाद मलिक अहमद दिवान | शकीला इजाज शेख |
| ९ | OP ९९ | फा.प्लॉट क्र.५२४, सदनिका क्र.१०२, गार्डन व्ह्यू सोसा, पनवेल | मे.एस.पी.डेव्हलपर्स | शफीक अब्दुल कादीर शेख नुरजहॉं शफीक शेख |
| १० | ९ | फा.प्लॉट क्र.४५८/४९७/४९८, सदनिका क्र.सी-१०४, कल्पतरु रिव्हरसाईड सोसा, पनवेल | पामेला मास्करेनस, ऑलविन प्लॅसिडस मास्करेनस | समीर श्रीपत आगलावे प्रतिक्षा समीर आगलावे |
| ११ | ४ | सिटी एस क्र.२०५/३७, सदनिका क्र.२०३, श्री शिल्प सोसा, पनवेल | दशरथ शनिवार शेळके | निलम दिपक जांभळे |
| १२ | १० | सिटी एसक्र.१३०३, जोशीवाडा, सदनिका क्र.बी-१, पनवेल | हेमंत बळीराम म्हसकर | महेयर बळीराम म्हसकर |
| १३ | १४ | सर्व्हे क्र.७४६/१ए, बी, ७४६/२ बी+१सी, ७४६/२ ए, बी, सदनिका क्र.३०५, रिद्धी रेजेन्सी सोसा, पनवेल | सुजित मोतीराम आंबवणे | नितीन जनार्दन पवार कविता नितीन पवार |
| १४ | ५ | सिटी एस.क्र.५२३, ५२३/१, ५२४, ५२४/१, सदनिका क्र.ए-१-४०३, माणेक नगर सोसा, पनवेल | विनायक नामदेव गायकवाड | विनया विनायक गायकवाड |
| १५ | १३ | फा.प्लॉट क्र.३९०/२, सदनिका क्र. ३०४, जय लक्ष्मी सोसा, पनवेल | प्रकाश शिवराम कदम | विनायक गवरु राठोड अनिता लक्ष्मण पवार |
| १६ | ७ | सिटी एस क्र.११३२-ए२, सदनिका क्र.६, सिद्धेश्वर सोसा. पनवेल | योगेश हरिभाई कंसारा रुपलबेन योगेश कंसारा | विश्वनाथ बी.साहू माधुरी विश्वनाथ शाह |
| १७ | | घर क्र.३०५, रोडपाली | पांडुरंग नथु ठाकूर | आनंद पांडुरंग ठाकूर किशोर पांडुरंग ठाकूर |
| १८ | | घर क्र.७७, रोडपाली गाव | उज्वला अंकुश पाटील | उज्वला अंकुश पाटील कविता राम पाटील |
| १९ | | घर क्र.१५६, कळंबोली | लक्ष्मण दगड्या नाईक | काना लक्ष्मण नाईक |
| २० | | घर क्र.१०४, आसुडगांव | दामजी मेकम निसार | विशाल गणेश सावंत |
| २१ | ७ | सिटी सर्व्हे क्र.२२१ ए, २२१/ए-१, २२१/ए-२, सदनिका क्र.३०४, वालिद हाऊस, पनवेल | अन्सार रुस्तुम सय्यद शकील शफी चौधरी मुलम्मिल एम.युसुफ दिवान | मुलम्मिल अमानुल्लाह कर्दमे |
| २२ | ५ | सिटी एस क्र.५१८/ए, सदनिका क्र. बी/१३, आनंदी अपार्टमेंट, पनवेल | धनश्री भालचंद्र दवे | कृष्णा तुकाराम टेंबकर |
| २३ | ८ | फा.प्लॉट क्र.२६३, ऑफिस क्र.१०८, त्रिमुर्ती आर्केड, पनवेल | मे.त्रिमुर्ती बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | संदीप सोपान ननावरे, प्रिया श्रीमती माने उर्फ प्रिया सिंदप ननावरे |
| २४ | ८ | फा.प्लॉट क्र.२६३, ऑफिस क्र.१०९, त्रिमुर्ती आर्केड, पनवेल | मे.त्रिमुर्ती बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | संदीप सोपान ननावरे, प्रिया श्रीमती माने उर्फ प्रिया सिंदप ननावरे |
| २५ | ८ | फा.प्लॉट क्र.२६३, ऑफिस क्र.१११, त्रिमुर्ती आर्केड, पनवेल | मे.साई कन्स्ट्रक्शन | संदीप सोपान ननावरे, प्रिया श्रीमती माने उर्फ प्रिया सिंदप ननावरे |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी २८ ते ३० जानेवारी पर्यंत पनवेलमध्ये

## सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेते व दिग्दर्शक विजय केंकरे यांची लाभणार उपस्थिती; सुप्रसिद्ध अभिनेते ओमकार भोजने ब्रँड अँबेसिडर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी २८ ते ३० जानेवारी पर्यंत पनवेलमध्ये होणार असून या स्पर्धेकरिता सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेते व दिग्दर्शक विजय केंकरे यांची उपस्थिती लाभणार असून या स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते ओमकार भोजने आहेत, अशी माहिती श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आज (दि. १९) खांदा कॉलनी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.



या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ०१ लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन गौरव करण्यात येणार आहे.तसेच मराठी रंगभूमीला समृद्ध करणारे मान्यवर व्यक्तींचा या वर्षीपासून जीवन गौरव स्वरूपात 'गौरव रंगभूमीचा' हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असून यंदा या पुरस्काराने ज्येष्ठ दिग्दर्शक प्रकाश बुद्धीसागर यांना सन्मानित करण्यात येणार आहे. ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे स्वरूप पुरस्काराचे असणार आहे, अशीही माहिती परेश ठाकूर यांनी यावेळी दिली.

सीकेटी महाविद्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेस अभिनेते ओमकार भोजने यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपमहापौर सीता पाटील, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील, नगरसेवक अनिल भगत, अभिनेते भरत सावले, सीकेटी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. के. पाटील, अभिषेक पटवर्धन, श्याम पुंडे, स्मिता गांधी, चिन्मय समेळ, अमोल खेर, गणेश जगताप, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पुढे सांगितले कि, नाट्य चळवळ वद्धींगत करण्यासाठी व नाट्य रसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. जळगाव, नागपूर, पुणे, पनवेल, रायगड या राज्यातील सर्व केंद्रांवर प्राथमिक फेरी पार पडल्या असून अंतिम फेरीसाठी २५ एकांकिकांची निवड झाली आहे. कोरोना संदर्भात नियमांचे पालन करून अंतिम फेरी २८, २९ आणि ३० जानेवारी २०२२ रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेतलेल्या व्यक्तींनाच प्रवेश असणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यांनी पुढे माहिती देताना सांगितले कि, २००७ साली मल्हार करंडक म्हणून हि राज्यस्तरीय स्पर्धा होती. कलाकार व प्रेक्षकांचा वाढता प्रतिसाद पाहता २०१४ पासून स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने हि राज्यस्तरीय स्पर्धा करण्यात आली. रमेश सिप्पी, प्रेमानंद गज्वी, गंगाराम गव्हाणकर, जयंत सावरकर, जयवंत वाडकर, केदार शिंदे, अंकुश चौधरी, जयवंत वाडकर, आदिती सारंगधर, किरण जुनेजा, प्रदीप मुळे, राजन ताम्हणे, समीर खांडेकर, राजन भिसे, शर्वाणी पिल्ले, क्रांती रेडकर, विजय चव्हाण, विजय कदम, विजू खोटे, अविनाश खर्शीकर, संजय नार्वेकर, ऋतुजा देशमुख, मनोज जोशी अशा अनेक दिग्गज कलाकारांनी या स्पर्धेला उपस्थित राहून मार्गदर्शन केले आहे. असे सांगतानाच २०१६ साली झालेल्या स्पर्धेत ओमकार भोजने यांनी सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार पटकाविला होता आणि ते आज आपल्या या स्पर्धेचे ब्रॅण्ड अँबेसिडर आहेत, याचा आपल्याला अभिमान असल्याचे त्यांनी नमूद करत हि स्पर्धा उत्तरोत्तर समृद्ध होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यावर्षी एकांकिका स्पर्धेचे थीम साँग तयार करण्यात आल्याचेही सभागृहनेते परेश ठाकूर यांनी सांगितले.

यावेळी ओमकार भोजने यांनी बोलताना सांगितले कि, मी अशा स्पर्धांमुळे पुढे आलो आहे. एकांकिका स्पर्धा आमच्या सारख्या कलाकारांना मोठी पर्वणी ठरली आहे. बक्षिसांपेक्षा संधी महत्वाची असते, मात्र या स्पर्धेत बक्षिस आणि संधी दोन्हीही मोठी आहे. युवा पिढीला असा व्यासपीठ मिळाला तर तो थांबत नाही. त्यामुळे हे व्यासपीठ नवोदित होतकरू कलाकारांना हक्काचे व्यासपीठ असून एकांकिका स्पर्धा नसती तर मी पुढे आलो नसतो, याच स्पर्धेतील मी उत्कृष्ट अभिनेता म्हणून मान मिळविला आणि त्याच स्पर्धेचा ब्रॅण्ड अँबेसिडर झालो, याचा मला अभिमान व अत्यानंद आहे. असेही भोजने यांनी आवर्जून नमूद केले.

# पेण एटीएम दरोडा प्रकरण ; पेण पोलिसांचे हात रिकामेच




**दै.रायगड नगरी । पेण**

पेण येथील एसबीआय बँकेच्या एटीएम मशीन फोडून ५६ लाख ३४ हजार ८०० रुपये दरोड्या प्रकरणी दोन दिवस उलटून गेले तरी पेण पोलिसांच्या हाती अजून कोणतेही ठोस धागेदोरे हाती लागले नसून अद्याप त्यांचे हात रिकामेच आहेत.

रविवारी ( ता.१६) रात्री पेण खोपोली मार्गावरील गुरव आळी समोरील सनसिटी इमारती मध्ये असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम मशीन वर अज्ञात दरोडेखोरांनी दरोडा टाकून एटीएम दोन मशीन गॅस कटरच्या सहाय्याने फोडून या दोन्ही मशीन मधील ५६ लाख ३४ हजार ८०० रुपयांची रोकड घेऊन पलायन केले होते. त्यावेळी मशीन कापण्यासाठी आणलेले गॅस कटर, सिलेंडर व इतर साहित्य तिथेच टाकून पळून गेले.

पेण शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या एटीएम मशीन गॅस कटर च्या सहाय्याने कापून धाडसी दरोडा टाकून दोन दिवस उलटून गेले तरी तपास करत असलेल्या रायगड गुन्हे अन्वेषण विभाग तसेच पेण पोलिसांच्या हाती अजून कोणतेही ठोस माहिती हाती लागलेली नाही. या दरोड्याच्या तपासासाठी रायगड पोलिसांनी आठ पथके तयार करण्यात आली असली तरी अद्याप पर्यंत पोलिसांचे हात रिकामेच असल्याने रायगड पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

डिसेंबर महिन्यात देखील अज्ञात दरोडेखोरांनी पेण शहरातील एकाच रात्री चौदा दुकाने फोडून लाखो रुपयांची चोरी केली होती. यावेळी पोलिसांची ससेमिरा टाकण्यासाठी फक्त आठ दुकानदारांनी पोलिसांत नोंद केली होती. या दरोडेखोरांचे सीसीटीव्ही चित्रण देखील पोलिसांना उपलब्ध झाले होते. या घटनेला एक महिना उलटला तरी त्याच्या तपासात देखील कोणत्याही प्रकारची प्रगती झालेली नाही. त्यामुळे पेण पोलिसांच्या कार्यक्षमतेवर देखील जनतेतून प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# अनधिकृत संस्था चालवण्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथे अनधिकृत संस्था चालून १९ अल्पवयीन मुलींच्या निवासाची व्यवस्था केली म्हणून खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर, सेक्टर १२ येथे जीवन सच सामाजिक संस्था अनधिकृतपणे चालविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विनीत म्हात्रे यांना समजली होती. त्यानुसार संस्थेत जाऊन पाहणी केली असता एकूण २४ मुलींना संस्थेत निवासी ठेवून त्यांची देखभाल करून त्यांना शाळेत पाठवून शिक्षण पूर्ण करण्याचे काम होत असल्याचे आढळून आले.

यावेळी सनी अँड्रूज यांना जीवन सच संस्थेने बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत मान्यता प्रमाणपत्र घेतले आहे का याची विचारणा केली. या वेळी कोणतेही प्रमाणपत्र त्या सादर करू शकले नाहीत. २४ मुलींपैकी १९ मुली या अल्पवयीन असल्याने त्यांना मान्यताप्राप्त संस्था खारघर येथे सुरक्षित निवाऱ्या करता ठेवण्यात आले. सनी याना संस्थेची कागदपत्रे सादर करण्यास मुदत देण्यात आली होती. मात्र त्यांनी प्रमाणपत्र सादर केले नाही.

त्यामुळे सनी अँड्रॉज आणि जीवन सच संस्था यांनी बालकल्याण विभागाकडे नोंदणी करणे बंधनकारक असताना तसे कोणतेही नोंदणी न करता अनधिकृत संस्था चालवली. त्यामुळे खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# नाना पटोले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करा ; पनवेल भाजपची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात बेताल वक्तव्य करणारे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी पनवेल भाजपच्यावतीने पनवेल तालुका पोलीस ठाणे यांच्याकडे करण्यात आली आहे.



भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या युवा पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पनवेल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना या संदर्भात निवेदन देऊन गुन्हा दाखल करण्याची आग्रही मागणी केली आहे. या शिष्टमंडळात भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, विश्वजित पाटील, रोहित घरत, अंकुश पाटील यांचा समावेश होता.

दिनांक १७ जानेवारी २०२२ रोजी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात बेताल वक्तव्य केले होते. पटोले यांनी (मोदींना मारू शकतो आणि मोदीला शिव्या देऊ शकतो) असे बेताल वक्तव्य एका कार्यक्रमात केले होते. देशाचे पंतप्रधान हे संपूर्ण भारताचे नेतृत्व करणारे सक्षम पंतप्रधान व्यक्ती आहेत. पंतप्रधान हे भारताचे सर्वोच्च पद आहे आणि या पदाचा आपण अभिमान राखला पाहिजे. त्यांच्या विरोधात असे बेताल वक्तव्य करणे हे देशद्रोही कृत्य आहे. मात्र नाना पटोले यांनी केलेले वक्तव्य अत्यंत निंदाजनक आहे, त्यामुळे भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल ग्रामीण मंडल तर्फे पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना निवेदन देऊन पंतप्रधानांविरुद्ध बेताल वक्तव्य करणारे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# उरणमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग, उरण महाविद्यालय, लायन्स क्लब उरण, मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक संस्था उरण, माजी विद्यार्थी संघ, टायगर ग्रुप उरण, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरण यांच्या संयुक्त विद्यमाने एम जे एफ लायन सदानंद सखाराम गायकवाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बुधवार दि २६ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, तहसील कार्यालयासमोर उरण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी इच्छुक रक्तदात्यांनी जास्तीत जास्त रक्तदान करून या पवित्र कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांचा भव्य मेळावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समिती, पनवेल आयोजित नैना सिडकोच्या विरोधात शेतकऱ्यांचा भव्य मेळावा स्वप्ननगरी, खानाव येथे आयोजित करण्यात आला आहे. २० जानेवारी २०२२ रोजी सकाळी बारा वाजता शेतकऱ्यांचा भव्य मेळाव्याला आमदार जयंत पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, आमदार हितेंद्र ठाकूर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याला शेतकऱ्यांनी व आजूबाजूच्या नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

मा.श्री.गोडसे मॅडम कोर्ट

अॅड.राजेश तु. बांगर
अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.२०५३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०२/२०२२

१) श्रीमती.वंदना गणपत ठोंबरे
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.हर्षल गणपत ठोंबरे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
दोघेही रा.निलकंठ दर्शन को.हौ.सो.,
फ्लॅट नं.बी–०३, प्लॉट नं.११/१२,
सेक्टर–७, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ यांचे वडील कै.गणपत नारायण ठोंबरे यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**अ) मौजे : निलकंठ दर्शन को.हौ.सो.फ्लॅट नं.बी–०३, प्लॉट नं.११/१२, सेक्टर–७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पु.), ता.पनवेल, जि.रायगड**

**ब) मयत कै.गणपत नारायण ठोंबरे यांच्या नावाने निलकंठ दर्शन को.हौ.सो.फ्लॅट नं.बी–०३, प्लॉट नं.११/१२, सेक्टर–७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पु.) यांनी भाग नं.१२१ ते १२५ अशी पाच एकूण किंमत रु.२५०/– फक्त (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) चे शेअर सर्टीफिकेट २६/०५/२००३ रोजी दिलेले आहे.**

कै.गणपत नारायण ठोंबरे हे दि.२६/०८/२०२० रोजी निलकंठ दर्शन को.हौ.सो.फ्लॅट नं.बी–०३, प्लॉट नं.११/१२, सेक्टर–७, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी/आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज दि.१९/०१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.श्री.मुजावर सो.कोर्ट
प्रो.जमा :
दावा समन्स

अॅड.संजय पाटकर
वादीचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
स्पे.मुकादमा नंबर १०८/२०२१
नि.नं.३९/ड
ने.ता.०९/०३/२०२२

सौ.लता लक्ष्मण पाटील वगैरे — वादी
विरुद्ध
श्री.प्रकाश गणपत पाटील व इतर — प्रतिवादी

प्रति,
१/२/४ श्रीमती.रेवंता कान्हा ठाकूर
उर्फ रेवंता निवृत्ती गोंधळी
रा.घार नं.४०८२, वहाळ बामणडोंगरी,
पोस्ट वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
१/२/५) श्रीमती.शेवंता कान्हा ठाकूर
उर्फ संगीता शरद चोरमेकर
रा.घर नं.१२–१, वावंजे गावातील मधली आळी,
पोस्ट वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्री.गिरीष घेवरचंद्र मुनिया
रा.२१, महावीर पॅलेस, रायवूड लोणावहाळ, ता.मावळ, जि.पुणे

ज्याअर्थी या जाहीर नोटीसद्वारे तुम्हास असे कळविण्यात येते की, सदर दाव्यातील वादी सौ.लता लक्ष्मण पाटील वगैरे रा.तुर्भे गाव, वाशी, नवी मुंबई यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात कराराची विशेष पुर्तता करून मिळण्यासाठी व इतर मागण्यासाठी दावा दाखल केला आहे. म्हणून सदर दाव्याच्या संबंधात आले म्हणणे मांडण्याकरिता दि.०९/०३/२०२२ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यशायोग्य सुचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकणारी व्यक्ती त्यांच्याबरोबर असेल अशा वकीलमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या बचावाच्या पुष्ट्यार्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेवू इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होवून दिला जाईल याची दक्षता घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास, तुमचा जबाब रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज दि.१९ माहे ०१/२०२२ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.निवृत्ती बा. पावशे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१५८१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०२/२०२२

१) श्री.किशोर बामा कोळी (मुलगा)
वय : ३८ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्री.हनुमान बामा कोळी (मुलगा)
वय : ३६ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.राजेश बामा कोळी (मुलगा)
वय : ३४ वर्षे, धंदा : व्यवसाय
४) श्रीमती.जोमीबाई बामा कोळी (पत्नी)
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कोपरागाव, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१० — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.बामा बाळु कोळी हे दि.१२/०८/२०२० रोजी मु.कोपरा गाव, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.बामा बाळु कोळी यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| २६ ब | ६० | १ | ०–४३–० | २.२५ |
| १५१ | ८२ | १४ | ०–०१–० | ०.१४ |
| '' | ८३ | ४ | १–११–४ | १.४२ |
| '' | ८३ | ७ | ०–२५–१२ | ०.७१ |
| १५० | ८४ | ७ | ०–०३–८ | ०.०६ |
| '' | ८३ | ६ | ०–०३–० | ०.०८ |

वरील अर्जदार हे मयत कै.बामा बाळु कोळी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.बामा बाळु कोळी यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१९/१/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री.नितेश रमाकांत पाटील यांचे मौजे : तरघर–कोंबडभुजे, ता.पनवेल येथील ताबेकब्जा व वहिवाटीतील खालील वर्णनाची घर मिळकत होती.

| बांधकाम क्रमांक | घर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| KB-186 | घर क्र.४१० | २३० |

सदर घर मिळकत सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी शासनाद्वारे संपीत केलेली असून संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात शासनाच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत श्री.नितेश पाटील यांना विकसित भूखंड वाटप केले आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| भूमी संपादीत निवाडा | सर्वे क्षणा नुसार बांध काम क्रमांक | बांधकामाचा पाया / बांधीव क्षेत्र चौ.मी. | बांधकामाचा वापर | भूमी निवाड्या नुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र चौ.मी. | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
| KOM-ICOGD-२३८ | KB-१८६ | ५४.४४ | निवासी | ७४.९६ | पुष्पक नगर, वहाळ, तालुका पनवेल | २५ A | ११९ | २३० |

सदर पुष्पक नगर, वहाळ, ता.पनवेल येथील सेक्टर क्र.२५ A मधील भूखंड नं.११९, क्षेत्र २३० चौ.मी.चा भूखंड श्री.नितेश रमाकांत पाटील यांनी भूखंड विकास करारनामा अन्वये ''नाखवा इंटरनॅशनल तर्फे श्री.जयराज किशोर कोळी'' यांना डेव्हलपमेंट करिता दिलेला आहे.

तरी वर नमूद घर मिळकत व भूखंडाचे टायटल बाबत कोणत्याही व्यक्तीस, संस्थेचा इत्यादी, यांना कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, तसेच सदर घर व भूखंडावर वा कोणत्याही भागावर कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., वा तत्सम कोणताही दावे मालकी हक्क व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तीने व संबंधितांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार वकीलांचे नमूद पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष भेटून संबंधित अधिकाराचे कागदपत्र जमा करावीत. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर घर मिळकत व भूखंड निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल व पुढील कारवाई करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व सदरचे हक्क सोडून दिलेले आहेत असे गृहीत धरले जाईल. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०१/२०२२

**सही/–**
**श्री.संजय ग. पाटकर**
**बि १४, तळमजला, राधा हरी निवास, रतन टॉकीज समोर,**
**लो.टिळक रोड, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९९२००२७७३८**

# संक्षिप्त...

## कोर्लई येथे आरोग्य व रक्ततपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील कोर्लई येथे विजय सागर, शिवस्मृती, व तुळजाभवानी मच्छीमार संघटना, मुरुड ग्रामीण रुग्णालय येथील आय.सी.टी.सी.विभाग, मुरुड तालुका क्षयरोग विभाग, आरोग्य उपकेंद्र कोर्लई, प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्ली-मांडला अंतर्गत महालॅब बोर्ली, लिंक वर्कर मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच आरोग्य व रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी आरोग्य उपकेंद्र कोर्लई येथील समुदाय आरोग्य अधिकारी एच.एस. फड, परिसेविका सुजाता भोसले, ग्रामीण रुग्णालय मुरूड येथील आयसिटीसी विभागातील समुपदेशक सचिन जाधव, पी पी एम सतिष दंतराव,वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक संकेत घरत, महालॅबचे जुतिका मगर, लिंक वर्कर उन्नती कचरेकर तसेच आशा स्वयंसेविका प्रमिला धोणसेकर, एलविन पेय, साक्षी आदी.उपस्थित होते. यावेळी आरोग्य विषयक एच.आय.व्ही/एड्स, क्षयरोगाबाबत सचिन जाधव, सतिष दंतराव व संकेत घरत यांनी माहिती देऊन लोकांमध्ये जनजागृती निर्माण केली. तसेच समुदाय आरोग्य अधिकारी एच. एस.फड व परिसेविका सुजाता भोसले यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन करून लोकांमधील असलेले गैरसमज दूर केले. व जमलेल्या लोकांचे महा लॅबच्या जुतिका मगर यांनी ऐच्छिक रक्त संकलन करून, त्यांची सीबीसी, थायरॉइड, एच.आय.व्ही, ब्लड शुगर, व क्षयरोग तपासणीसाठी २३ जणांचे थुंकी नमुने घेऊन एकूण ५३ ग्रामस्थांची आरोग्य व रक्त तपासणी करण्यात आली.

## प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ई-श्रम कार्ड वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते मा.श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्ष, गुळसुंदे पंचायत समिती विभाग व जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने दापीवली येथे ई-श्रम कार्ड वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गुळसुंदे पंचायत समिती सदस्य जगदीश पवार यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले यावेळी मा.सरपंच प्रकाश गाताडे, गणेश म्हसकर, मनीषा गाताडे, सदस्य समृद्धी भगत, प्रमोद माळी, रामचंद्र माने, अनंता जाधव, मा.सदस्य प्राजक्ता गाताडे, निलेश तांडेल, भारत पवार व ग्रामस्थ उपस्थित होते.



# पर्यटन व वनसमृद्धी

पर्यावरण संवर्धनाबरोबरच कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध करून स्थानिकांना रोजगार मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यानुसार पर्यटन धोरणांतर्गत पात्र पर्यटन प्रकल्पांना वस्तू व सेवा कराचा परतावा अनुज्ञेय करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समुद्र किनार्यांचा सर्वांगीण, शाश्वत व एकसमान विकास करण्याकरिता राज्याचे बीच शॅक धोरण जाहीर करण्यात आले आहे. यामुळे राज्याच्या किनार्यालगत पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सोयी-सुविधांचा विकास होईल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनीचा खासगीकरणाच्या माध्यमातून पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबतचे धोरणही जाहीर करण्यात आले आहे. मुंबईला जागतिक पर्यटन नकाशावर आणण्यासाठी विविध ठिकाणी पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी समन्वय व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. पर्यटकांची निसर्गाकडे ओढ लक्षात घेता राज्याचे कृषी पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. पर्यटकांना खेडेगावात निसर्गरम्य ठिकाणी राहता यावे, प्रत्यक्ष शेतीच्या कामाचा अनुभव घेता यावा, ग्रामीण संस्कृती, कला, खाद्य यांचा आस्वाद घेता यावा, यासाठी हे धोरण आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. महाराष्ट्रात अनेक निसर्गरम्य वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनाची ठिकाणे आहेत. यापैकी जेथे हॉटेल किंवा राहण्याच्या सोयी कमी आहेत, तेथे कॅराव्हॅन पर्यटनाकरिता मोठा वाव आहे. अशा ठिकाणी कॅराव्हॅन व कॅम्परव्हॅनच्या साहाय्याने पर्यटकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून सुनियोजित व्यवस्था निर्माण करण्यासाठी राज्यात कॅराव्हॅन पर्यटन धोरण राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यात आदरातिथ्य उद्योग सुरू करण्यासाठी कराव्या लागणार्या प्रक्रियेमध्ये पूर्वी ७० परवानग्यांसाठी अर्ज करावे लागत होते. यामध्ये सुलभता आणण्याकरिता एक खिडकी योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. यापुढे फक्त १० परवानग्या/ परवाने/ ना-हरकत प्रमाणपत्रे आणि नऊ स्वयंप्रमाणपत्रे आवश्यक असतील. यामुळे भविष्यात आदरातिथ्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार वाढेल. राज्यात आदरातिथ्य क्षेत्रास औद्योगिक दर्जा देण्यात आला आहे. यानुसार केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून १ एप्रिल २०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणीपट्टी, मालमत्ता कर, विकासकर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात किनारपट्टीचा प्रदेश, त्याला समांतर सह्याद्री पर्वतरांगा, सह्याद्रीच्या जोडीला सातपुडा आणि विंध्य अशा पर्वतरांगा आहेत. प्राचीन दुर्गवैभव, पर्वतांमधून उगम पावणार्या नद्या तसेच विदर्भातील घनदाट जंगले असा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध निसर्ग लाभलेल्या राज्यात जमीन, हवा आणि पाणी या तीनही प्रकारातील साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करण्यास मोठा वाव आहे. यामुळे पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत महत्त्व-पूर्ण बाबींचा समावेश करून राज्यात साहसी पर्यटन उपक्रम धोरणास मान्यता देण्यात आली आहे.

मुंबई शहरात पर्यटकांचे आकर्षण असणार्या उच्च न्यायालय, जुने सचिवालय, मुख्य महानगर दंडाधिकारी कोर्ट, उच्च न्यायालय परिसरातील सार्वजनिक बांधकाम कार्यालय, पोलीस मुख्यालय, पदवीदान सभागृह, एल्फिन्स्टन महाविद्यालय, एल्फिन्स्टन तंत्र संस्था, रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, पश्चिम रेल्वे मुख्यालय, गेट वे ऑफ इंडिया, जनरल पोस्ट ऑफिस या १३ प्रसिद्ध ऐतिहासिक वास्तूंचे प्रकाश प्रदीपन करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# भयावह स्थितीवर साहित्य, कला हेच प्रभावी औषध

### प्रा. अशोक बागवे यांचे साहित्य संमेलन यशस्वी करण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या दोन वर्षापासून जगामध्ये जी काही भयंकर स्थिती निर्माण झाली आहे. ते गडद मळभ दूर करण्याची ताकद केवळ साहित्य आणि कलेत असल्याचा ठोस दावा करून हेच खरे रामबाण औषध असल्याने पनवेल येथे होणारे पहिले साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी सार्यांनीच मरगळ झटकून साहित्य, कलेचा आस्वाद घेतला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे लाडके कवी, गीतकार प्रा. अशोक बागवे यांनी नेमक्या शब्दात केले.



कांतीलाल प्रतिष्ठान रायगड आणि पनवेल संघर्ष समितीने येत्या शनिवारी, २२ जानेवारीला आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील स्व. हरिश्चंद्र चांगू कडू साहित्य नगरीत राज्यव्यापी साहित्य संमेलन आयोजित केले आहे. त्याचा आराखडा अतिशय शिस्तबद्धतेने आखण्यात आला आहे. काल सायंकाळी तथास्तू सभागृहात प्रा. बागवे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनाची महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.व्यासपिठावर ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ. भक्तीकुमार दवे आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष कांतीलाल कडू, राजकीय विश्लेषक तथा ज्येष्ठ पत्रकार विलास आठवले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री ज्योत्सना रजपूत आणि डॉ. राजेद्र राठोड यांनी केले.

प्रा. बागवे म्हणाले की, साहित्य अत्यंत पवित्र आहे. ते सत्य, शिव आणि सुंदरतेचे प्रतिक आहे. त्या मांगल्याचा आदर करून पनवेलच्या आद्य क्रांतिवीरांच्या भूमीत पहिल्यांदाच साहित्य संमेलन होत असताना त्याचे तितकेच पावित्र राखण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. के. गो. लिमये वाचनालयातून सकाळच्या प्रहरी प्रारंभ होणार्या दिंडीचा मान साहित्य संमेलनात महत्वाचा असणार आहे. दिंडी एकदा खांद्यावर घेतल्यानंतर पुन्हा नाट्यगृहापर्यंत जमिनीवर ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले. दिंडीला महिलांनाही खांदा लावता येईल, असे त्यांनी स्पष्ट करताच उपस्थित महिलांनी सक्षमीकरणाच्या पताका फडकावत टाळ्यांचा गजर केला. यावेळी बागवे यांनी काही महत्वाच्या सुचना करून पनवेलचे हे साहित्य संमेलन आपले मानस पुत्र कांतीलाल कडू करत असल्याचा आनंद असल्याचे सांगितले. डॉ. दवे आणि कांतीलाल कडू यांनी संमेलनाची रूपरेषा स्पष्ट केली. साहित्य संमेलनासोबत के. गो. लिमये वाचनालयातून सकाळी ८ वाजता वाजत गाजत निघणार्या साहित्य ग्रंथदिंडीत सहभागी होवून पनवेलच्या साहित्याच्या कीर्तीचा शिखर नव्याने बांधू या, असे आवाहन कांतीलाल कडू यांनी केले. ज्येष्ठ साहित्यिक विलास गावडे, आगरी कवितांचा बादशहा पुंडलिक म्हात्रे, कवी गुणवंत पाटील, रांगोळीकार प्रियांका जठार, कवी रंजना केणी, मृदगंधच्या रेहना, सुनिता रामचंद्र, बंडू देशमुख, संघर्ष रिक्षा चालक संघटनेचे पदाधिकारी तसेच कांतीलाल प्रतिष्ठान आणि पनवेल संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# झुकलेल्या विद्युत पोलांची वीज वितरण कंपनीने केली तातडीने दुरूस्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सावरकर चौक परिसरात असलेले वीज वितरण कंपनीचे विद्युत पोल हे गंजलेले व एका बाजूला झुकले गेल्याने ते कधीही तेथून ये-जा करणार्या लोकांच्या अंगावर पडून मोठी दुर्घटना होवू शकते. या संदर्भात स्थानिकांनी संबंधित खात्याकडे तक्रार केल्यावर वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना जाग येऊन त्यांनी तातडीने सदर दोन्ही पोलांची दुरूस्ती व नव्याने पोल उभारण्याचे काम आजपासून सुरू केले आहे.

शहरातील सावरकर चौक परिसरात असलेली श्री योग सोसायटी याच्या समोरील विद्युत पोल तसेच मारुती मंदिराच्या बाजूला असलेला विद्युत पोल हा गेल्या काही दिवसापासून एका बाजूला झुकला असून तो कधीही खाली पडण्याची शक्यता आहे. तसेच सदर विद्युत पुल हा गंजलेला व अनेक ठिकाणी सडत चालला आहे. त्यामुळे हे दोन्ही विद्युत पोल खाली पडल्यास मोठी दुर्घटना होवू शकते. तसेच त्यामुळे कित्येक काळासाठी विद्युत पुरवठा सुद्धा खंडीत होवून शॉर्टसर्किट सारख्या घटना सुद्धा घडू शकतात व हे कोणाच्या जीवावर तरी बेतू शकते. अत्यंत जुन्या काळातील हे विद्युत पोल उभारले असून त्याची अवस्था सध्यातरी दयनिय व जीर्ण झालेली आहेत. त्यामुळे हे दोन्ही विद्युत पोल तातडीने बदलण्याची गरज होती. या नागरी समस्येकडे वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता पांडूरंग बोके यांनी दखल घेऊन लाईनमन परेश केणी व असिस्टंट लाईनमन अरूण पाटील व त्यांच्या पथकाने आज त्याठिकाणी येऊन प्रत्यक्ष दोन्ही पोल बदलून त्याठिकाणी नवीन पोल उभारणीच्या कामाला व इतर वायरिंगच्या कामाला सुरवात केल्याने परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

### पनवेल परिसरात सामाजिक बांधिलकीचे पाणी!

# रामकी फाऊंडेशन व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनी या 'राष्ट्रीय मिशन'ला अमूल्य योगदान

### लाखो रुपये खर्च करून सहा ठिकाणी बसवले जलशुद्धीकरण प्लांट




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडूनही पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष करून शुद्ध पाणी रहिवाशांना मिळत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून रामकी फाऊंडेशन व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनी यांच्या मार्फत जलशुध्दीकरण प्लांट सहा ठिकाणी बसवण्यात आले आहेत. जेणेकरून येथील ग्रामस्थांना स्वच्छ पाणी पिण्यासाठी उपलब्ध होणार आहे. सी एस आर मधून हा उपक्रम राबवण्यात आला आहे.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढले असले तरी पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातल्या त्यात ग्रामीण भागामध्ये स्वच्छ शुद्ध पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील समाविष्ट गावांमध्ये ही परिस्थिती आहे. त्यातील नागरिकांना पिण्यायोग्य पाणी मिळत नाही. आजही त्या परिसरामध्ये बोरवेल वर अवलंबून रहावे लागते. किंवा तेथील विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरले जाते. ते पाणी पिण्यायोग्य आहे की नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होतात. वास्तविक पाहता हे पाणी पिण्याच्या दृष्टिकोनातून शुद्ध व स्वच्छ करणे स्थानिक स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी आहे. परंतु निधी अभावी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. स्वच्छ सुरक्षित पिण्याच्या पाण्याची तरतूद हे एक अतिशय महत्त्वाचे क्षेत्र आहे, ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. यासाठी भारत सरकारने 'स्वच्छ भारत मिशन आणि जल जीवन मिशन' सुरू केले आहे. पिण्याचे पाणी सहजासहजी उपलब्ध नसलेल्या दुर्गम गावांमध्ये आणि ग्रामीण भागात आरओ वॉटर फिल्टर प्लांट बसवून रामकी फाऊंडेशन व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनी या 'राष्ट्रीय मिशन'ला आपले अमूल्य योगदान देत आहेत. आत्तापर्यंत रामकी फाउंडेशन व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनी ने तळोजा एमआयडीसी च्या आजूबाजूच्या गावांमध्ये ६ आरओ वॉटर फिल्टर प्लांट बसवले आहेत. एका आरओ वॉटर फिल्टर प्लांटची किंमत सुमारे ९ लाख रुपये आहे, अशाप्रकारे रामकी फाउंडेशनने गावकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी देण्यासाठी सुमारे ५४ लाख रुपये खर्च केले आहेत. गरजेचे मूल्यांकन केल्यानंतर, फाऊंडेशन अजूनही जवळपासच्या गावांमध्ये आरओ प्लांट बसविण्याची प्रक्रिया करत आहे. आरओ वॉटर फिल्टर प्लांट बसवल्यामुळे ग्रामस्थांचा वेळ, पैसा आणि ऊर्जा यांची बचत होतआहे व ह्याचा फायदा जवळच्या गावांना व लोकसमुदायाला मोठ्या प्रमाणात होत आहे. गावांमध्ये आरओ प्लांट बसवण्याबरोबरच, रामकी फाऊंडेशनने विविध प्रकारचे सीएसआर प्रकल्प सुरू केले आहेत . समाजातील महिला आणि तरुणांसाठी उपजीविका कार्यक्रम, टेलरिंग केंद्र आणि संगणक केंद्रे स्थापन करणे, शेतकरी क्लब स्थापन करणे आणि त्यांना नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण देणे, शाळा दुरुस्तीचे काम करणे, शाळेतील शौचालये बांधणे, अश्या प्रकाराचे विवीध उपक्रम यशस्वी रित्या मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनीच्या सीएसआर विभागा कडून राबविण्यात येत आहे.

नैसर्गिक आपत्तीच्या वेळी रामकी फाऊंडेशन व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनी नेहमीच मदतीचा हात दिला आहे. फाऊंडेशनने कोविडच्या पहिल्या आणि दुसर्या लाटेत बाधित लोकांना किराणा सामानाचे वाटप केले, तसेच पुराच्या वेळी कोकण विभागातील पूरग्रस्तांना आवश्यक साहित्याची मदत केली.कोरोनाच्या तिसर्या लाटेमध्ये रामकी फाऊंडेशन व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनीने लसीकरण मोहिमेसाठी लस साठवण्यासाठी एमजीएम हॉस्पिटलला आयएलआर रेफ्रिजरेटर प्रदान केले आहे.

> शुद्ध पाणी रहिवाशांना मिळत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून रामकी फाऊंडेशन व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. कंपनी यांच्या मार्फत जलशुध्दीकरण प्लांट सहा ठिकाणी बसवण्यात आले आहेत. जेणेकरून येथील ग्रामस्थांना स्वच्छ पाणी पिण्यासाठी उपलब्ध होणार आहे. सी एस आर मधून हा उपक्रम राबवण्यात आला आहे.
>
> **सोमनाथ मालघर**
> **डायरेक्टर, मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी**

# न्हावा ग्रामपंचायतीवर अडीच महिन्यांपासून पाणी टंचाईचे संकट

### पाणी टंचाई दूर करण्याचे आश्वासन कागदावरच तर पाण्यासाठी महिलांची मैलोनमैल पायपीट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील न्हावाशेवा पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या साडेचार हजार लोकसंख्येच्या न्हावा ग्रामपंचायतीतील गावांना मागील अडीच महिन्यांपासून पाणी टंचाईने ग्रासले आहे.नागरिकांना ८ - ९ दिवसातून फक्त एकदाच पाणी मिळत आहे.तेही अर्धा तास.त्यामुळे नागरिकांवर घोटपाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.

न्हावा ग्रामपंचायत ओएनजीसी प्रकल्पाकडून दरवर्षी मिळणाऱ्या ५५ लाख मालमत्ता करामुळे सधन म्हणून ओळखली जाते.ग्रामपंचायतीला एमआयडीसीकडून पाणी पुरवठा होत असला तरी प्रत्येक महिन्याचे बील ओएनजीसीकडून अदा केले जाते. तेही घरगुती नव्हे तर वाणिज्य दराने ग्रामपंचायतीची दररोज दिड लाख लिटर पाण्याची मागणी आहे.मात्र मागील अडीच महिन्यांपासून मागणीच्या निम्म्याहून कमी पाणी पुरवठा होत आहे.

अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणी टंचाईचा सामना करण्याची वेळ ग्रामपंचायतीवर येऊन ठेपली आहे. पाणी टंचाईमुळे नागरिकांवर तलाव, विहीर आणि उपलब्ध होणाऱ्या इतर स्त्रोतचा आधार घ्यावा लागत असल्याची माहिती सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी दिली आहे. नागरिकांना भेडसाविणारी पाणी टंचाईची समस्या थोड्या प्रमाणात का होईना दूर करण्यासाठी ग्रामपंचायतीने नैसर्गिक स्त्रोतचा वापर सुरू केला आहे. सुमारे तीन लाख खर्चून अडीच इंच व्यासाच्या तीन बोअरवेल खोदल्या आहेत.

तसेच उपलब्ध असलेल्या विहीरीचीही साफ सफाई करून पाणी मिळविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. सिडकोकडे दररोज दहा टँकर पाणी मिळण्याची करण्यात आली आहे. मात्र फक्त दोन-तीनच पाण्याचे टँकर मिळत आहेत. तेही अनियमितपणे. टँकरचा खर्च पंचायत फंडातून करावा लागत आहे.गाव उंचावर असल्यामुळे आणि कमी दाबाने येत असल्याने पाणी दिड लाख क्षमता असलेल्या ओव्हरहेड टाकीत चढवावे लागत आहे.

मागील महिन्यात पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, प्रशांत ठाकूर, काँग्रेस कमिटीचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, ग्रामपंचायत आणि सिडको, एमआयडीसी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवीमुंबई महापालिका यांच्या सोबत बैठक झाली. या बैठकीत न्हावा ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही पाणी टंचाईचे संकट दूर झालेले नसल्याने पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मैलोनमैल पायपीट करावी लागत आहे. तर बाजारात उपलब्ध असलेल्या महागड्या किमतीचे पाणी विकत घ्यावे लागत असल्याने महिलांचे बजेट कोलमडले आहे. यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक झाले असल्याचेही सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी सांगितले.

# नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांतील सोयीसुविधांच्या योग्य देखभालीसाठी डॉ. संजय मुखर्जीतर्फे विशेष समितीची स्थापना

नवी मुंबईतील सिडकोच्या रेल्वे स्थानकांवर प्रवाशांशी निगडीत सोयीसुविधांबाबत विविध विषयांचा आढावा घेऊन, त्यावर योग्य देखभालीसाठी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्यातर्फे एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकांसह या समितीमध्ये अन्य ५ अधिकारी हे सदस्य आहेत.

नवी मुंबई मुंबईला जोडली जावी याकरिता सिडकोने रेल्वेच्या सहाय्याने नवी मुंबईमध्ये उपनगरी रेल्वे मार्गांचे जाळे निर्माण केले. सिडकोने नवी मुंबईमध्ये विकसित केलेली रेल्वे स्थानके अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दोन्ही बाजूंस चढ-उतार करता येतील असे प्रशस्त फलाट, भव्य फोरकोर्ट एरिया, स्थानकांवर वाणिज्यिक संकुलांची उभारणी यांमुळे नवी मुंबईतील रेल्वे स्थानके ही अन्य उपनगरीय स्थानकांच्या तुलनेत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सिडकोतर्फे सिवूड्स दारावे स्थानक वगळता नवी मुंबईतील उर्वरित स्थानकांची देखभाल केली जाते.

तथापि, प्रवाशांना या रेल्वे स्थानकांवर कोणत्याही समस्यांना सामोरे जावे लागू नये या पार्श्वभूमीवर डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये सहव्यवस्थापकीय संचालकांव्यतिरिक्त सिडकोतील मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) (सदस्य), अधीक्षक अभियंता (पालघर व नगर नियोजन-१) (सदस्य सचिव), पणन व्यवस्थापक (वाणिज्यिक) (सदस्य), नवी मुंबई महानगरपालिका प्रतिनिधी (सदस्य) आणि भारतीय रेल्वेचे प्रतिनिधी (सदस्य) यांचा समावेश आहे.

पुढील १५ दिवसांत या समितीतर्फे नवी मुंबईतील स्थानकांना भेट देण्यात येऊन सिडकोच्या व रेल्वेच्या कामांची व्याप्ती, नवी मुंबई महानगरपालिकेची भूमिका, स्थानकांवरील समस्यां संदर्भातील त्रुटी, या त्रुटी दूर करण्याकरिता शिफारसी या बाबींचा आढावा सदर समितीकडून घेतला जाणार आहे. त्यानंतर या संदर्भातील अहवाल समितीकडून उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सादर केला जाणार आहे.

> नवी मुंबईला सदैव गतिमान ठेवण्यामध्ये येथील उपनगरीय रेल्वेची भूमिका महत्त्वाची आहे. नवी मुंबईतील उपनगरीय रेल्वे नेहमीच कार्यक्षम राहावी यावर सिडकोने नेहमीच भर दिला आहे. स्थानकांसंदर्भात प्रवाशांना सोयीसुविधा अधिक योग्य पद्धतीने प्रदान करण्याकरिता विशेष समिती स्थापन करण्यात आली असून यामुळे प्रवास अधिक सुखकर होईल.
>
> **डॉ. संजय मुखर्जी**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**